जय जय त्र्यंबकराज गिरिजानाथा गंगाधरा हो।
त्रिशूलपाणी शंभो नीलग्रीवा शशिशेखरा हो।
वृषभारूढ फणिभूषण दशभुज पंचानन शंकरा हो।
विभूतिमाला जटा सुंदर गजचर्मांबरधरा हो॥ ध्रु॥

पडलें गोहत्येचें पातक गौतमऋषिच्या शिरीं हो।
त्यानें तप मांडिलें ध्याना आणुनि तुज अंतरीं हो।
प्रसन्न होउनि त्यातें स्नाना दिधली गोदावरी हो।
औदुंबरमुळिं प्रगटे पावन त्रैलोक्यातें करी हो॥ जय॥ १॥

धन्य कुशावर्ताचा महिमा वाचे वर्णूं किती हो।
आणिकही बहु तीर्थें गंगाद्वारादिक पर्वतीं हो।
वंदन मार्जन करिती त्यांचे महादोष नासती हो।
तुझिया दर्शनमात्रें प्राणी मुक्तीतें पावती हो॥ जय॥ २॥

ब्रह्मगिरीची भावें ज्याला प्रदक्षिणा जरि घडे हो।
तैं तैं काया कष्टे जंव जंव चरणीं रुपती खडे हो।
तंव तंव पुण्य विशेष किल्मिष अवघें त्यांचें झडे हो।
केवळ तो शिवरूप काळ त्याच्या पायां पडे हो।। जय।। ३।।

लावुनियां निजभजनीं सकळहि पुरविसि मनकामना हो।
संतति संपति देसी अंतीं चुकविसि यमयातना हो।
शिव शिव नाम जपतां वाटे आनंद माझ्या मना हो।
गोसावीनंदन विसरे संसारयातना हो।। जय जय।। ४।।